ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानाकिंत 'अ' श्रेणी)

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – 422 222



कृषिविज्ञान विद्याशाखा

School of Agricultural Sciences

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम

Certificate Programme in Dog Owner Awareness (C224)

सुधारित माहितीपुस्तिका : 2025-26

Website: https://www.ycmou.ac.in or https://ycmou.digitaluniversity.ac

23rd August, 2025

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका 2025-26

This work by **YCMOU** is licensed under a **Creative Commons Attribution-Non Commercial- Share Alike 4.0 International License.**

- मूल्य : श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम- रु. 50/-
- प्रथम प्रकाशन : 1 जून 2025
- अक्षर जुळणी : श्रीमती. माधुरी गोडसे, कृषिविज्ञान विद्याशाखा, य. च. म. मु. वि, नाशिक.
- प्रकाशक : श्री. दिलीप भरड, कुलसचिव, य. च. म. मु. वि, नाशिक- 422 222

माहितीपुस्तिका विकसन :

प्रा. (डॉ.) माधुरी सोनवणे
संचालक,
कृषिविज्ञान विद्याशाखा,
य. च. म. मु. वि, नाशिक

डॉ. भागवत चव्हाण
शैक्षणिक संयोजक,
कृषिविज्ञान विद्याशाखा,
य. च. म. मु. वि, नाशिक

■ विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या कृषिविज्ञान विद्याशाखेतील श्वान पालन प्रमाणपत्र शिक्षणक्रमांचे छापील स्वयं-अध्ययन साहित्य प्रवेश घेतलेल्या अभ्यासकेंद्रांवरून अंतिम लेखी परीक्षेपूर्वी घेऊन जावे. परीक्षा झाल्यानंतर आपला छापील स्वयं-अध्ययन साहित्यावर कोणताही हक्क नाहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

■ Academic Bank of Credits (ABC) -ID तयार करण्याबाबतची सूचना

सर्व विद्यार्थी मित्रांनो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार आपणास Academic Bank of Credits (ABC) - ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेली प्रमाणपत्रे, पदविका, पदवीची माहिती Digilocker (ABC- NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडिट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits (ABC) - ID नोंदणी http://www.abc.gov.in या पोर्टलवर करता येईल किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या वेबसाईटला भेट द्या. या वेबसाईटवरील Student Zone या बटणाला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits (ABC) - ID तयार करण्यासंबंधी माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाईटवर उपलब्ध केलेले आहे.

सुस्वागतम

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

कृषिविज्ञान विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे आपले हार्दिक स्वागत!

आपल्या देशामध्ये श्वानपालन दिवसेंदिवस लोकप्रिय होत चालले आहे. श्वान केवळ पाळीव प्राणी नसून मानवाचा विश्वासू साथीदार आणि सहचर आहे. श्वानांच्या संगतीत मानवाला आनंद आणि निःस्वार्थ प्रेम मिळते. एक जबाबदार श्वानपालक होण्यासाठी फक्त प्रेम पुरेसे नाही तर श्वानांच्या मूलभूत गरजा, त्यांचे वर्तन आणि त्यांच्याशी प्रभावी संवाद साधण्याचे कौशल्य किंवा श्वानांची योग्य पद्धतीने काळजी घेण्याची गरज याची माहिती असणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर, कृषि विज्ञान विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम नव्याने सुरु करण्यात आला आहे. हा शिक्षणक्रम सर्व श्वान प्रेमींसाठी एक मार्गदर्शक सिद्ध होईल, अशी आशा आहे. सदर शिक्षणक्रमातून आपण श्वानांच्या विविध प्रजाती, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक गरजा, त्यांच्या प्रशिक्षणाच्या विविध पद्धती, त्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी, त्यांच्याशी कसा संवाद साधावा आणि एक जबाबदार श्वानपालक म्हणून आपली भूमिका का महत्वाची आहे, याबद्दल सखोल माहिती मिळेल.

आपणास सूचना करण्यात येत आहे की, मुक्त विद्यापीठाच्या श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यापूर्वी श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका (Program Prospectus), प्रवेश अर्ज (Online Admission Form), आणि प्रवेश कालावधी वेळापत्रक (Admission Time Table) यांचा अभ्यास करूनच Online प्रवेश अर्ज भरावा. (वरील सर्व माहिती विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac OR http://www.ycmou.ac.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.) आपल्याला काही शंका असल्यास आपल्या जवळच्या श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

आपणास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम उपयुक्त ठरो हीच सदिच्छा!

प्रा. (डॉ.) माधुरी सोनवणे
संचालक
कृषिविज्ञान विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका 2025-26

अनुक्रमणिका

1. कृषिविज्ञान विद्याशाखेचा परिचय.....
2. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम प्रवेश व प्रवर्तन वेळापत्रक.....
3. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C224) .....
   - 3.1 शिक्षणक्रमाची संरचना.....
   - 3.2 अध्ययन पद्धती.....
   - 3.3 प्रवेश प्रक्रिया.....
   - 3.4 शिक्षणक्रम शुल्क.....
   - 3.5 कालावधी.....
   - 3.6 माध्यम.....
   - 3.7 मूल्यमापन प्रक्रिया.....
   - 3.8 Academic Bank of Credits (ABC) -ID तयार करण्याची सूचना.....
4. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रांची यादी.....
5. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमांसाठी संपर्कसत्र वेळापत्रक.....
6. मुक्त विद्यापीठ विभागीय केंद्रे.....
7. विद्यापीठ संपर्कसूची.....
8. परिशिष्टे.....
   - 8.1 परिशिष्ट: विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता (1992)
   - 8.2 परिशिष्ट: मुक्त विद्यापीठाच्या पदवी / पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता (1995)
   - 8.3 परिशिष्ट: विद्यापीठ अनुदान आयोग ठराव (2004)
   - 8.4 परिशिष्ट: एकाच वेळी दोन शिक्षणक्रम पूर्ण करण्यासंदर्भातील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) मार्गदर्शक सूचना (2022)

1. कृषिविज्ञान विद्याशाखेचा परिचय

कृषिविज्ञान विद्याशाखा (SAS) ची स्थापना 1989 साली झाली असून, 1990 साली केवळ 81 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. कालांतराने विद्याशाखेने प्रचंड प्रगती साधली असून, 2008 पासून दरवर्षी 20,000 हून अधिक विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. आजपर्यंतच्या 35 वर्षांच्या वाटचालीत एकूण 4,00,271 विद्यार्थ्यांनी या विद्याशाखेतून शिक्षण घेतले आहे.

कृषिविज्ञान विद्याशाखेने महाराष्ट्रातील शेतकरी समुदायाला शेतीतील शाश्वत पद्धतींचे शिक्षण देऊन त्यांचे शैक्षणिक आणि कार्यात्मक सहाय्य यशस्वीरित्या केले आहे. वर्ष 2025 पासून विविध कृषिविषयक प्रमाणपत्र आणि पदविका शिक्षणक्रमांबरोबरच मत्स्यपालन आणि पशुपालन क्षेत्रातील प्रमाणपत्र शिक्षणक्रम कृषिविज्ञान विद्याशाखेमार्फत सुरु करण्यात येत आहेत. कृषिविज्ञान विद्याशाखेने मराठी भाषेत व्यावसायिक आणि रोजगाराभिमुख शिक्षण प्रदान करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या अंतर्गत मुख्यतः महाराष्ट्रातील परंपरागत शिक्षणाला वंचित राहिलेले विद्यार्थी, शेती करणारे शेतकरी, महिला शेतकरी आणि ग्रामीण तरुणाई यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचविणे हे विद्याशाखेचे मुख्य ध्येय आहे.

कृषिविज्ञान विद्याशाखेची उद्दिष्टे:

1. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर महिला, सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांना दूरशिक्षणाद्वारे स्वयंशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.
2. शेतकऱ्यांच्या ज्ञान आणि कौशल्याच्या सक्षमीकरणाद्वारे उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्याशी संबंधित महत्वाच्या कृषी विकास क्षेत्रांमध्ये शिक्षणक्रम राबविणे.
3. शेतकरी आणि ग्रामीण युवकांची सामाजिक-आर्थिक स्थिती वाढविण्यासाठी ग्रामीण युवकांमध्ये स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे.

2. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम प्रवेश व प्रवर्तन वेळापत्रक

2.1) विद्यार्थ्यांसाठी आणि अभ्यासकेंद्रांसाठी महत्वाच्या सूचना -

1. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे निश्चित केलेले आहे.

2. विद्यापीठाच्या https://ycmou.digitaluniversity.ac या लिंक वर श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका (Prospectus) 2025-26, फॉर्म भरण्याचे प्रेझेन्टेशन, विविध परिपत्रके, प्रपत्रे ऑनलाइन प्रवेश अर्ज (online admission form) भरण्यासाठीचे पर्याय उपलब्ध करण्यात आलेले आहे.

3. सर्व विद्यार्थी, सर्व श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र प्रमुख आणि संयोजक यांना सुचित करण्यात येते की सर्वप्रथम विद्यापीठाच्या पोर्टलवरून या वर्षाची श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका 2025-26 डाऊनलोड करून व त्याची प्रिंट काढुन संपूर्णपणे व्यवस्थित वाचावी.

4. विद्यापीठ पोर्टलवर ऑनलाईन प्रवेश अर्ज अचूकपणे कसा भरावा या संदर्भातील प्रेझेंटेशन टाकण्यात आलेले आहे. कृपया ते व्यवस्थित डाऊनलोड करून संपूर्णपणे काळजीपूर्वक अभ्यासावे.

5. सदरील ऑनलाइन फॉर्म भरते वेळी विद्यार्थ्याकडे पासपोर्ट साइज फोटोकॉपी, स्वतःची स्वाक्षरी असलेली फोटोकॉपी, जन्मदाखला, पात्रता परीक्षा गुणपत्रक, इत्यादी बाबींचे अधिकृत मूळ दाखले / प्रमाणपत्रे यांच्या पूर्णतः सुस्पष्टपणे स्कॅन केलेल्या सॉफ्ट फोटोकॉपी स्वतःकडे ऑनलाईन प्रवेश अर्ज संबंधित ठिकाणी अपलोड करण्यासाठी तयार ठेवाव्यात.

6. विद्यार्थी सदरील ऑनलाईन प्रवेश अर्ज स्वतः त्याला उपलब्ध असलेल्या संगणकावर भरू शकेल, तथापि यासाठी अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी संबंधित श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र अभ्यासकेंद्रांची मदत घ्यावी.

7. विद्यापीठाने विहित केलेल्या कालावधीमध्येच संपूर्णतः अचूकपणे भरलेला, सत्यता असलेला, तसेच सर्व अपलोड केलेली कागदपत्रे सुस्पष्ट दिसतील असे स्कॅन असलेले प्रवेश अर्जच पुढील प्रवेश प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येतील याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

8. विद्यार्थ्यांना एका वेळी कोणत्याही एका शिक्षणक्रमासाठी आणि एकाच अभ्यासकेंद्रावर प्रवेश शुल्क भरून प्रवेश घेता येईल.

2.2) श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या महत्वाच्या तारखा:

प्रथम सत्र

1. ऑनलाइन प्रवेश अर्ज भरण्याचा कालावधी: 01 ते 30 जुलै, 2025

   (अंतिम मुदत विद्यापीठ धोरणानुसार राहील)
2. अभ्यासकेंद्रांना पुस्तके वितरण करण्याचा कालावधी: 01 ते 30 सप्टेंबर 2025
3. अभ्यासकेंद्रांवरील संपर्कसत्र तारखा: 1 सप्टेंबर ते 15 डिसेंबर 2025
4. अंतर्गत परीक्षा/ गृहपाठ सादर करण्याच्या तारखा: डिसेंबर 2025
5. परीक्षा अर्ज भरणे: सप्टेंबर ते ऑक्टोबर 2025
6. अंतिम प्रात्यक्षिक परीक्षा (अभ्यासकेंद्रावर) कालावधी: डिसेंबर 2025 (शेवटचा आठवडा)
7. अंतिम लेखी परीक्षा (परीक्षा केंद्रावर) कालावधी: जानेवारी 2026 (पहिला आठवडा)
8. निकाल जाहीर करणे: अतिंम परीक्षेनंतर 45 दिवसांमध्ये

द्वितीय सत्र

1. अभ्यासकेंद्रांवरील संपर्कसत्र तारखा: 15 जानेवारी 2026 ते 15 एप्रिल 2026
2. अंतर्गत परीक्षा/ गृहपाठ सादर करण्याच्या तारखा: एप्रिल 2026 (पहिला आठवडा)
3. परीक्षा अर्ज भरणे: मार्च ते एप्रिल 2026
4. अंतिम प्रात्यक्षिक परीक्षा (अभ्यासकेंद्रावर) कालावधी: एप्रिल 2026 (शेवटचा आठवडा)
5. अंतिम लेखी परीक्षा (परीक्षा केंद्रावर) कालावधी: मे 2026 (शेवटचा आठवडा)
6. निकाल जाहीर करणे: अतिंम परीक्षेनंतर 45 दिवसांमध्ये

❖ **परीक्षा कालावधी संदर्भात विद्यापीठाच्या धोरणानुसार वेळोवेळी केलेले बदल बंधनकारक राहतील.**

3. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम

श्वान आणि शेतकरी यांचा संबंध प्राचीन काळापासून अतिशय जवळचा आणि महत्वाचा आहे. श्वान हा शेतकऱ्यांचा केवळ मित्र नसून त्यांचा एक विश्वासू सहकारीही आहे. शेतकऱ्याच्या शेतात आणि घरी पाळलेला श्वान शेतातील गायी, म्हशी, शेळ्या, शेतमाल आणि शेतकऱ्याच्या कुटुंबाचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. अशा या श्वानाच्या संगोपनाबाबत सविस्तर माहिती शेतकऱ्यांना असणे आवश्यक आहे. सदर शिक्षणक्रमामध्ये श्वानपालनाची मुलभूत माहिती, श्वानांच्या विविध प्रजाती, त्यांच्या शारीरिक मानसिक गरजा, श्वानाच्या पोषणविषयक गरजा, श्वानाचे आरोग्य आणि पशुवैद्यकीय काळजी, श्वानाचे वर्तन आणि प्रशिक्षणाच्या विविध पद्धती, श्वानासोबत संवाद साधण्याची तंत्रे, श्वानाचे प्रजनन आणि पुनरुत्पादन इत्यादीबाबत सखोल माहिती समाविष्ट करण्यात आली आहे.

शहरी आणि ग्रामीण भागात श्वानपालनाची आवड असणाऱ्या व्यक्तींना योग्य माहिती आणि तंत्रज्ञान नसल्यामुळे अनेक अडचणी येतात. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम हा श्वान प्रेमी आणि श्वानांच्या

कल्याणासाठी काम करणाऱ्या व्यक्तींसाठी एक उत्कृष्ट माध्यम आहे. हा शिक्षणक्रम श्वानांसाठी सुरक्षित, आनंददायी आणि आरोग्यपूर्ण जीवन तयार करण्यासाठी महत्वपूर्ण ठरतो.

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे उद्दिष्टे:

1) श्वानांची योग्य काळजी घेण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये विद्यार्थ्यांना प्रदान करणे.
2) श्वानांची निगा, प्राथमिक उपचार आणि मूलभूत श्वान प्रशिक्षण यांसारख्या क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष अनुभव आणि व्यावहारिक कौशल्ये प्रदान करणे.
3) जबाबदार श्वानपालकत्वाला प्रोत्साहन देणे आणि श्वानांचे आरोग्य आणि कल्याण सुनिश्चित करणे.
4) श्वानपालनामध्ये मानवी आणि नैतिक पद्धतींना प्रोत्साहन देणे.

3.1 शिक्षणक्रमाची संरचना

1. एकूण अभ्यासक्रम : 12
2. कालावधी : 12 महिने
3. एकूण श्रेयांक : 24
4. एकूण अध्ययन तास: 96 तास
5. एकूण गुण : 600 गुण

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C224) : कालावधी - 01 **वर्ष**	श्रेयांक
प्रथम सत्र :	12
CDH001: श्वानपालकांसाठी मूलभूत माहिती - भाग 1	2
CDH002: श्वानपालकांसाठी मूलभूत माहिती - भाग 2	2
CDH003: श्वानपालकांसाठी मूलभूत माहिती - प्रात्याक्षिक	2
CDH004: श्वानाचे पोषण	2
CDH005: श्वानाचे आरोग्य आणि पशुवैद्यकीय काळजी	2
CDH006: श्वानाचे पोषण, आरोग्य आणि पशुवैद्यकीय काळजी - प्रात्याक्षिक	2
द्वितीय सत्र :	12
CDH007: श्वानाचे वर्तन	2
CDH008: श्वानाचे प्रशिक्षण	2
CDH009: श्वानाचे वर्तन आणि प्रशिक्षण - प्रात्याक्षिक	2
CDH010: श्वान पुनरुत्पादन	2
CDH011: श्वान प्रजनन	2
CDH012: श्वान पुनरुत्पादन आणि प्रजनन - प्रात्याक्षिक	2
एकुण श्रेयांक	24

3.2 अध्ययन पद्धती

प्रस्तुत शिक्षणक्रमासाठी विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रामार्फत प्रशिक्षणार्थीना स्वयं-अध्ययन साहित्य पुरविण्यात येईल. सदर अध्ययन साहित्याची सॉफ्टकॉपी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी त्याचा वापर करावा. या शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे तात्विक पाठयक्रमांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, प्रात्यक्षिके, इत्यादी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करावयाची आहेत. स्वाध्याय लेखनानंतर चर्चा, कृतिसत्रे, उद्बोधन, प्रबोधन, इत्यादींसाठी संपर्कसत्रे आयोजित केली जातील. त्याबाबत सविस्तर तपशील वेळोवेळी अभ्यासकेंद्रांना कळविण्यात येईल व अभ्यासकेंद्रामार्फत अध्ययनार्थीना कळविले जाईल.

संपर्कसत्राचे आयोजन व प्रशिक्षणार्थीची उपस्थिती

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे त्याच्या सर्व प्रकारच्या कार्यासाठी योजनाबद्ध संपर्कसत्राची आवश्यकता आहे. ही संपर्कसत्रे विद्यापीठाने काळजीपूर्वक निवडलेल्या अभ्यासकेंद्रांवर आयोजित होतील. या विद्यापीठाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार संपर्कसत्रांचे आयोजन करण्यात येईल. संपर्कसत्रातील विषयतज्ज्ञांची उपस्थिती व सहभाग अत्यावश्यक समजला जाईल. त्याचप्रमाणे संपर्कसत्रात शिक्षणक्रमाचा तात्विक भाग, शिक्षणातील व्यवहार व प्रात्यक्षिके यांमधील परस्परसंबंध राखता यावा, तत्त्वांचा, व्यावहारिक उपयोजनांचा कार्यभाग सहजपणे शक्य व्हावा, व्यवहारातून तत्त्वांची संकल्पना दृढ व्हावी या पद्धतीने संपर्कसत्रांचे वेळापत्रक व आयोजन करण्यात येते. अंतिम परीक्षेला बसण्यासाठी किमान 80 टक्के उपस्थिती आवश्यक आहे.

3.3 प्रवेश प्रक्रिया

- **प्रवेश पात्रता:** इयत्ता 8 वी पास, वय 18 वर्षे पूर्ण
- **प्रवेश निवड:** कृषि विज्ञान विद्याशाखेतील श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाला प्रथम येणाऱ्यास प्रथम (First Come First) या तत्वावर पात्र व्यक्तीस प्रवेश दिला जाईल.
- **प्रती अभ्यासकेंद्र प्रवेश क्षमता:** प्रत्येक अभ्यासकेंद्रावर एकूण 40 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. अभ्यासकेंद्र सुरु ठेवण्यासाठी किमान 10 विद्यार्थ्यांचा प्रवेश आवश्यक आहे. त्यापेक्षा विद्यार्थी संख्या कमी असल्यास त्यांचे प्रवेश विद्यापीठाच्या नियमानुसार नजीकच्या केंद्रावर वर्ग करण्यात येतील किंवा परीक्षेसाठी त्यांना नजीकच्या परीक्षाकेंद्रावर स्थलांतरित करण्यात येईल.

3.4 शिक्षणक्रम शुल्क

मुक्त विद्यापीठाच्या श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमांचे वार्षिक शुल्क पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम शुल्क तक्ता -

अ.क्र.	खर्चाचे शीर्षक	श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम
अ	**संवैधानिक शुल्क**	
1	नोंदणी शुल्क (Registration Fees)	200
2	पात्रता शुल्क (Eligibility Fee)	100
3	ओळखपत्र शुल्क (Identity Card Fee)	10
4	माहिती पुस्तिका शुल्क (Prospectus Fee)	50
5	ई सुविधा शुल्क (e-Suvidha / e- Services Fee)	70
6	ग्रंथालय शुल्क (Library Fee)	0
7	मा. कुलपती कार्यालयाचे कार्यक्रम शुल(Chancellor's Office Events Fees)	0
8	क्रीडा शुल्क (Sports Fees)	0
9	विद्यार्थी कल्याण कार्यक्रम शुल्क (DSW Fees)	0
10	आपत्कालीन व्यवस्थापन शुल्क (Disaster Management Fees)	0
11	राष्ट्रीय सेवा योजना शुल्क (NSS Fees)	0
12	माजी विद्यार्थी संघ शुल्क (Alumni Fees)	10
13	संवाद पत्रिका शुल्क (Sanvad Fees)	0
14	पदविका/ पदवी प्रमाणपत्र शुल्क (Graduation/Convocation Fees)	0
15	विद्यार्थी विमा शुल्क (Student Insurance Fees)	20
	एकुण	460
ब	**1. शैक्षणिक शुल्क (Tuition Fee)**	
16	शैक्षणिक शुल्क - विद्यापीठ हिस्सा (Tuition Fee University Share)	2000
17	शैक्षणिक शुल्क - अभ्यासकेंद्र हिस्सा (Tuition Fee Study Center Share)	2000
	एकुण	4000
	2. परीक्षा शुल्क	
18	परीक्षा शुल्क - लेखी परीक्षा (Theory Examination Fees)	1600
19	परीक्षा शुल्क - प्रात्यक्षिक परीक्षा (Practical Examination fees)	880
	एकुण	2480
	एकूण शुल्क (अ + ब)	6940

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम शैक्षणिक शुल्क — अभ्यासकेंद्र हिस्सा विवरण तक्ता:

अ.क्र.	खर्चाचे शीर्षक	अभ्यासकेंद्र हिस्सा विवरण
1	अभ्यासकेंद्र प्रमुख मानधन	120
2	अभ्यासकेंद्र संयोजन व मानधन	120
3	अभ्यासकेंद्र लेखापाल मानधन	100
4	अभ्यासकेंद्र सहाय्यक मानधन	85
5	अभ्यासकेंद्र शिपाई मानधन	75
6	मार्गदर्शक प्राध्यापक मानधन	500
7	अभ्यासकेंद्र परिचलन व विकसन	1000
	एकूण	2000

टिप: मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मानधनामध्ये संपर्कसत्र घेणे, विद्यार्थी उपस्थिती नोंद करणे, अंतर्गत परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासणे, गृहपाठ देणे, गृहपाठ तपासणे, कार्यपुस्तिका तपासणे, निकाल तयार करणे, इत्यादी कामांचा समावेश आहे.

3.5 कालावधी

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचा कालावधी एक वर्षाचा आहे. सदर शिक्षणक्रमाला एकदा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी दोन वर्षांसाठी वैध असेल. एखाद्या विद्यार्थ्यांने दोन वर्षात शिक्षणक्रम पूर्ण न केल्यास अशा विद्यार्थ्याला विहित पुनर्नोंदणी शुल्क रुपये 2000/- एवढी रक्कम भरून पुढील दोन वर्षासाठी पुनर्नोंदणी कालावधी देण्यात आला आहे. या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये विद्यार्थी विहित पुनर्परीक्षार्थी शुल्क भरून परीक्षा देऊ शकेल. पुनर्नोंदणीचा दोन वर्षाचा कालावधी संपल्यानंतर विद्यार्थ्याला वाढीव मुदत दिली जाणार नाही. पुनर्नोंदणीसंदर्भात विद्यापीठाने वेळोवेळी घेतलेले निर्णय विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील.

3.6 माध्यम

विद्यापीठाने संपूर्ण अध्ययन-साहित्य हे मराठी भाषेत तयार केलेले आहे. त्यामुळे संपूर्ण शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी भाषा राहील. संपर्कसत्रांचे माध्यम आणि उत्तरपत्रिकेचे माध्यम मराठी राहील.

3.7 मूल्यमापन प्रक्रिया

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रम एकूण 600 गुणांचा आहे. या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन तात्विक (Theory) अभ्यासक्रमासाठी 30 टक्के अंतर्गत मूल्यमापन आणि 70 टक्के अंतिम मूल्यमापन तसेच प्रात्यक्षिक (Practical) अभ्यासक्रमासाठी 50 टक्के अंतर्गत मूल्यमापन आणि 50 टक्के अंतिम मूल्यमापन अशा पद्धतीने करण्यात येते.

अ) तात्विक (Theory) अभ्यासक्रम मूल्यमापन

तात्विक (Theory) अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मूल्यमापनामध्ये 15 गुणांची लेखी परीक्षा घेतली जाते. 15 गुणांच्या लेखी परीक्षेसाठी दीर्घोत्तरी प्रश्न (1 प्रश्न - 10 गुण) व लघुत्तरी प्रश्न (1 प्रश्न - 5 गुण) विचारले जातात.

अंतिम मूल्यमापनामध्ये 35 गुणांची लेखी परीक्षा घेतली जाते. 35 गुणांच्या लेखी परीक्षेसाठी दीर्घोत्तरी प्रश्न (1 प्रश्न- 10 गुण), लघुत्तरी प्रश्न (2 प्रश्न - 10 गुण) आणि अतिलघुत्तरी प्रश्न (5 प्रश्न -15 गुण) विचारले जातात.

तात्विक (Theory) अभ्यासक्रम मूल्यमापन तक्ता:

अ.क्र.	अभ्यासक्रम प्रकार	श्रेयांक	मूल्यमापन घटक	भारांश	अधिकतम गुण	मूल्यमापन साधन
1	तात्विक	2	अंतिम परीक्षा (EE)	70%	35	प्रश्नपत्रिका 35 गुण i. दीर्घोत्तरी प्रश्न (1 प्रश्न) - 10 गुण (2 पैकी कोणताही 1 प्रश्न सोडवा) ii. लघुत्तरी प्रश्न (2 प्रश्न) - 10 गुण (3 पैकी कोणतेही 2 प्रश्न सोडवा) iii. अतिलघुत्तरी प्रश्न (5 प्रश्न) -15 गुण (6 पैकी कोणतेही 5 प्रश्न सोडवा)
			अंतर्गत मूल्यमापन (CA)	30%	15	प्रश्नपत्रिका 15 गुण i. स्वाध्याय 1 दीर्घोत्तरी प्रश्न (1 प्रश्न) - 10 गुण लघुत्तरी प्रश्न (1 प्रश्न) - 5 गुण

ब) प्रात्यक्षिक (Practical) अभ्यासक्रम मूल्यमापन

प्रात्यक्षिक (Practical) अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मूल्यमापनामध्ये 25 गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाते. 25 गुणांच्या प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये, कार्यपुस्तिका मूल्यमापन - 15 गुण व प्रयोग क्षेत्रातील उपस्थिती - 10 गुण याप्रमाणे मूल्यमापन केले जाते.

अंतिम मूल्यमापनामध्ये 25 गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाते. 25 गुणांच्या प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये, एका प्रात्यक्षिकाची कार्यपद्धती लिहून प्रात्यक्षिक करून दाखविणे आणि निरीक्षणे लिहिणे (15 गुण) आणि मौखिक परीक्षा (10 गुण) याप्रमाणे मूल्यमापन केले जाते.

प्रात्यक्षिक (Practical) अभ्यासक्रम मूल्यमापन तक्ता -

अ.क्र.	अभ्यासक्रम प्रकार	श्रेयांक	मूल्यमापन घटक	भारांश	अधिकतम गुण	मूल्यमापन साधन
1	प्रात्यक्षिक	2	अंतिम परीक्षा (EE)	50%	25	a. प्रात्यक्षिक परीक्षा - 15 गुण i. प्रात्यक्षिकाची कार्यपद्धती लिहून प्रत्याक्षिक करून दाखविणे, निरीक्षणे लिहिणे (1 ते 2 प्रात्याक्षिके) - 15 गुण b. मौखिक परीक्षा - 10 गुण
			अंतर्गत मूल्यमापन (CA)	50%	25	a. कार्यपुस्तिका मूल्यमापन - 15 गुण b. प्रयोग क्षेत्रातील उपस्थिती - 10 गुण

क) उत्तीर्णतेचे नियम

- विद्यार्थ्याने सर्व अंतर्गत कार्य पूर्ण करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतर्गत कार्य आणि अंतिम परीक्षेमध्ये स्वतंत्रपणे मिळून किमान 40 टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे.
- अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत आणि अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण करून अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

अभ्यासक्रमनिहाय मूल्यमापन तक्ता -

अ.क्र.	सांकेतांक	अभ्यासक्रमाचे नाव	प्रकार	श्रेयांक	अंतर्गत कार्य (CA) T-30 %Weightage P-50% Weightage		अंतिम परीक्षा(EE) T-70 %Weightage P-50% Weightage		एकूण गुण (TM)	
					किमान गुण	कमाल गुण	किमान गुण	कमाल गुण	मान गुण	कमाल गुण
प्रथम सत्र										
1	CDH001	श्वानपालकांसाठी मूलभूत माहिती - भाग 1	तात्विक	2	6	15	14	35	20	50
2	CDH002	श्वानपालकांसाठी मूलभूत माहिती - भाग 2	तात्विक	2	6	15	14	35	20	50
3	CDH003	श्वानपालकांसाठी मूलभूत माहिती - प्रात्याक्षिक	प्रात्याक्षिक कार्य	2	10	25	10	25	20	50
4	CDH004	श्वानाचे पोषण	तात्विक	2	6	15	14	35	20	50
5	CDH005	श्वानाचे आरोग्य आणि पशुवैद्यकीय काळजी	तात्विक	2	6	15	14	35	20	50
6	CDH006	श्वानाचे पोषण, आरोग्य आणि पशुवैद्यकीय काळजी - प्रात्याक्षिक	प्रात्याक्षिक कार्य	2	10	25	10	25	20	50
एकूण (प्रथम सत्र)				**12**	**44**	**110**	**76**	**190**	**120**	**300**
द्वितीय सत्र										
7	CDH007	श्वानाचे वर्तन	तात्विक	2	6	15	14	35	20	50
8	CDH008	श्वानाचे प्रशिक्षण	तात्विक	2	6	15	14	35	20	50
9	CDH009	श्वानाचे वर्तन आणि प्रशिक्षण - प्रात्याक्षिक	प्रात्याक्षिक कार्य	2	10	25	10	25	20	50
10	CDH010	श्वान पुनरुत्पादन	तात्विक	2	6	15	14	35	20	50
11	CDH011	श्वान प्रजनन	तात्विक	2	6	15	14	35	20	50
12	CDH012	श्वान पुनरुत्पादन आणि प्रजनन - प्रात्याक्षिक	प्रात्याक्षिक कार्य	2	10	25	10	25	20	50
एकूण (द्वितीय सत्र)				**12**	**44**	**110**	**76**	**190**	**120**	**300**
एकूण (प्रथम + द्वितीय सत्र)				**24**	**88**	**220**	**152**	**380**	**240**	**600**

ड) मूल्यमापनासंदर्भात महत्वाच्या सूचना

- तात्विक अभ्यासक्रमाची 35 गुणांची अंतिम लेखी परीक्षा 75 मिनिटांची असेल.
- शिक्षणक्रम नोंदणी कालावधी असेपर्यंत विद्यार्थ्याला अंतर्गत कार्य सादर करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल.
- विद्यापीठाने विकसित केलेले अध्ययन साहित्य ज्या भाषेत असेल त्या भाषेतील प्रश्नपत्रिका अधिकृत मानण्यात येईल.
- प्रश्नांच्या स्वरूपानुसार शब्द मर्यादा पुढीलप्रमाणे असेल - 10 गुणांसाठी 150 ते 200 शब्द, 5 गुणांसाठी 75 ते 100 शब्द, 3 गुणांसाठी 40 ते 50 शब्द.
- 2 श्रेयाकांची अंतिम प्रात्यक्षिक परीक्षा 75 मिनिटांची असेल.

3.8 Academic Bank of Credits (ABC) -ID तयार करण्याची सूचना

विद्यार्थी मित्रांनो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार आपणास Academic Bank of Credits (ABC) - ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेली प्रमाणपत्रे, पदविका, पदवीची माहिती Digilocker (ABC- NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडिट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits (ABC) - ID नोंदणी http://www.abc.gov.in या पोर्टलवर करता येईल. किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या वेबसाईटला भेट द्या. या वेबसाईटवरील Student Zone या बटणाला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits (ABC) - ID तयार करण्यासंबंधी माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाईटवर उपलब्ध केलेले आहे.

4. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रांची यादी

Dog Owner Awareness Programme Study Center: 2025-26

Sr. No.	Centre Code with Location	Centre Address	Centre Head Contacts Details	Centre Coordinator Contacts Details
01	Pune 62604	Universal Animal Welfare Society, Haveli, Tal.- Haveli, Dist.- Pune E-Mail - universalanimalwelfare@gmail.com	Dr. Swati Jogdand Mob. No. - 7350155556 E-Mail - universalanimalwelfare @gmail.com	Prof. Deveshwar Gogenni Mob. No. -9625902202
02	Kharpurdi 2302A	Agriculture Education Centre, Krishi Vigyan Kendra, Marathwada Sheti Sahaya Mandal, Khapurdi, Jalna-431203	Dr. S. V. Sonune Mob. No. -9028254946 E-Mail: pclvkjalna@gmail.com	Dr. H. M. Aage Mob. No. -9028254950 E-Mail: drhanumanta@gmail.com
03	Baramati 62341	Dr.Sharadchandra Pawar College of Agriculture, Baramati Sharadanager, Malegaon Colony, Taluka- Baramati, Dist. Pune - 413722 Ph. No. 02112-255518 agricolbmt@rediffmail.com h.baramaticoa62341@gmail.com c.baramaticoa62341@gmail.com	Prof. Nalawade N. A. Mob. No. -7350248069 E-Mail: nilesh.nalawade@gmail.com	Dr. S. D. Sorate Mob. No. - 7387813536 E-Mail: sachin.sorate@gmail.com

5. श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमांसाठी संपर्कसत्र वेळापत्रक

प्रथम सत्र (Semester-I)
जून 2025 ते डिसेंबर 2025

संपर्क-सत्र क्र.	संपर्कसत्र दिनांक	अभ्यासक्रम सांकेतांक	**बौद्धिक सत्र: T (Theory): सकाळी 10:00 ते 11:00 आणि 11:00 ते 12:00** **प्रात्यक्षिक सत्र: P (Practical): दुपारी 02:00 ते 4:00**
1.	07.09.25	CDH001	T1: श्वान माणसाळविण्याची प्रक्रिया: श्वान अनुवांशिक उत्क्रांती, श्वानाचे शास्त्रीय वर्गीकरण, श्वान माणसाळविण्याची प्रक्रिया, श्वान आणि माणसाचे सहजीवन, श्वान सहजीवनप्रक्रियेतील बदल, श्वानाची प्रजात नोंदणी संस्था: भारतीय श्वान संघटना, आंतरराष्ट्रीय श्वान संघटना, श्वान नोंदणीची प्रक्रिया
2.	07.09.25	CDH001	T2: श्वानाची बाह्य शरीररचना आणि वैशिष्ट्ये: श्वानाची बाह्य शरीररचना, श्वानाची हालचाल, श्वानाच्या विविध शरीरसंस्थांचे अवयव, श्वानाच्या शरीरातील संवेदना अवयव (इंद्रिये)
3.	07.09.25	CDH003	P1: श्वानाच्या शरीराच्या अवयवांची ओळख
4.	14.09.25	CDH001	T3: निरोगी श्वानाची ओळख: श्वानाचे आयुष्यमान, श्वानाची त्वचा आणि केस, श्वानाची श्लेष्मल त्वचा असणारे अवयव, श्वानाचे अन्न सेवन आणि शरीराचे वजन, श्वानाच्या शरीराचे तापमान, श्वानाच्या नाडीचा दर, श्वानाचा श्वसन दर, श्वानासाठी ओळख पद्धती: श्वानासाठी तात्पुरत्या ओळख पद्धती, श्वानाची अर्ध-स्थायी ओळख पद्धती, श्वानासाठी कायमस्वरूपी ओळख पद्धती, भविष्यातील श्वान ओळख पद्धती
5.	14.09.25	CDH001	T4: श्वानाच्या प्रजातींचे वर्गीकरण: खेळांसाठी उपयुक्त श्वान प्रजाती, शिकारी श्वान प्रजाती, विशेष कामासाठी उयुक्तत श्वान प्रजाती, सहचर श्वान प्रजाती, लहान खेळणी सदृश्य श्वान प्रजाती, संरक्षक श्वान प्रजाती
6.	14.09.25	CDH003	P2: निरोगी श्वानाची ओळख श्वान प्रजातींची ओळख
7.	27.09.25	CDH001	T5: श्वानाच्या प्रजातींची निवड आणि श्वान खरेदी: वर्गीकृत आणि अवर्गीकृत श्वान प्रजाती, नर आणि मादी श्वानाची खरेदी, श्वान प्रजातीची निवड, श्वान पिल्लू खरेदी करण्याचे स्रोत, श्वान पिल्लू निवडीचे निकष, श्वानपालकांकडे असलेल्या नोंदणीकृत श्वानाची खरेदी, श्वान प्रजननकर्त्याकडे असलेल्या नोंदणीकृत श्वानाची खरेदी, श्वान दुकानातून नोंदणीकृत प्रजातीची खरेदी, अवर्गीकृत श्वान दत्तक घेणे
8.	27.09.25	CDH001	T6: श्वानाची वाहतूक: श्वान वाहतुकीची साधने आणि प्रकार, श्वानाची देशांतर्गत वाहतूक, श्वानाची आंतरराष्ट्रीय वाहतूक, श्वानाची वाहतूकीदरम्यान काळजी आणि व्यवस्थापन, वाहतूकीदरम्यान आजारी श्वानाची काळजी
9.	27.09.25	CDH003	P3: श्वानाच्या विविध प्रकारच्या निवारागृहांचा अभ्यास श्वान हाताळणी आणि नियंत्रण
10.	05.10.25	CDH002	T7: श्वानासाठी सभोवतालचे वातावरण: श्वानासाठी सुरक्षित आणि आरामदायी वातावरण, श्वानासाठी श्वानपालकाच्या घरात निवाऱ्याची जागा, श्वानाच्या स्वतंत्र निवारागृहाच्या बांधकामाचा तपशील, श्वानासाठी पिण्यायोग्य पाण्याची उपलब्धता, श्वानाच्या व्यायामासाठी सुरक्षित जागा श्वानासाठी निवारागृह: श्वान निवारागृहाचे महत्व, श्वान निवारागृहाचे तपशील
11.	05.10.25	CDH002	T8:श्वानासाठी शारीरिक व्यायाम: श्वानासाठी नियमित शारीरिक व्यायामाची गरज, श्वान प्रजातीनुसार व्यायामाची गरज, श्वानासाठी व्यायामाचे प्रकार

			श्वानासाठी निगा राखण्याची आणि सजावटीची विविध साधने: श्वानाची निगा राखण्यासाठीची साधने, श्वानाचे प्रतिकूल हवामानानुसार संरक्षण करण्याची साधने, श्वान स्वच्छतेसाठी साधने, श्वानासाठी आहाराची भांडी, श्वानाला पाणी पिण्याची साधने, श्वान सजावटीची साधने, श्वान प्रदर्शनासाठी श्वानाची पूर्वतयारी
12.	05.10.25	CDH003	P4: श्वानासाठी लागणारे साहित्य आणि साधनांची ओळख श्वानाची स्वच्छता आणि निगा
13.	11.10.25	CDH002	T9: पाळीव श्वानाचा विमा: श्वान विम्याचे प्रकार आणि फायदे, श्वानाच्या विम्यासाठी अटी आणि शर्ती, श्वान विमा अंतर्भूत बाबी, विमा अंतर्भूत बाबींचा विस्तार, विम्यासाठी श्वानाचे मूल्यमापन, श्वान विमा पॉलिसीचा हप्तादर, श्वान विम्याचे दावे
14.	11.10.25	CDH002	T10: श्वान वसतिगृह: श्वानासाठी वसतिगृहाची गरज आणि महत्व, श्वानासाठी वसतिगृहाची निवड, श्वानाला वसतिगृहात ठेवण्यापूर्वी श्वानपालकाने करावयाची तयारी, श्वानाला वस्तीगृहातून घरी नेतांना करावयाची तपासणी
15.	11.10.25	CDH003	P5: श्वानाच्या भांड्यांची स्वच्छता करणे श्वान वसतिगृहास भेट देणे
16.	12.10.25	CDH002	T11: श्वानपालनामधील कायदेशीर आणि नैतिक जबाबदाऱ्या: श्वानपालनासंबंधी कायदे आणि नियम, श्वानपालनामधील नैतिक जबाबदाऱ्या
17.	12.10.25	CDH002	T12: श्वानाविषयीचे गैरसमज आणि तत्थ्ये: श्वानाविषयीचे गैरसमज, श्वानाविषयी तत्थ्ये, श्वानाविषयी अद्वितीय आणि आश्चर्यकारक तत्थ्ये
18.	12.10.25	CDH003	P6: श्वानाच्या विविध नोंदी ठेवणे
19.	02.11.25	CDH004	T13: श्वानांच्या पोषणविषयक आणि आहाराच्या गरजा: श्वानाच्या आहारामध्ये संतुलित पोषणाचे महत्व, श्वान प्रजाती निहाय पोषण गरजा, श्वान पिल्लांचा आहार, प्रौढ श्वानाचा आहार, वृद्ध श्वानाचा आहार, गरोदर आणि स्तनदामादी श्वानाचा आहार, कष्टकरी आणि प्रजननक्षम श्वानासाठी आहार, नवजात, स्तनपान तोडलेल्या, अनाथ श्वान पिल्लांचा आहार श्वानाची पचन प्रणाली आणि त्याची कार्ये: श्वानाच्या पचनसंस्थेचे भाग, श्वानाची पचन प्रक्रिया, श्वानाच्या पचनावर परिणाम करणारे घटक
20.	02.11.25	CDH004	T14: श्वानाचे आरोग्य आणि पुनरुत्पादनात पोषकतत्वांचे महत्त्व: श्वानाच्या आहारामध्ये मुख्य पोषक अन्नद्रव्यांचे महत्त्व आणि कार्ये, श्वानाच्या आहारामध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांचे महत्त्व आणि कार्ये, श्वानामध्ये पोषक अन्नद्रव्यांच्या कमतरतेची आणि अतिवापराची लक्षणे श्वानाच्या खाण्याच्या सवयी: श्वानाच्या आहारासंबंधित सवयी, आवडीनुसार अन्न निवडण्याच्या समस्येचे निराकरण, श्वानाच्या आहार वर्तनावर परिणाम करणारे घटक
21.	02.11.25	CDH006	P7: श्वानाच्या पोषणविषयक गरजांचा अभ्यास करणे
22.	08.11.25	CDH004	T15: श्वानाच्या खाद्याचे वर्गीकरण: श्वानाचे खाद्य प्रकार, श्वानासाठी घरगुती आहार श्वानाच्या घरगुती आणि तयार खाद्याचे फायदे आणि तोटे, पाळीव श्वानाला नियमितपणे दिल्या जाणाऱ्या मानवी अन्नामुळे निर्माण होणारे धोके, श्वानामध्ये वजन कमी करण्यासाठी पौष्टिक आहार धोरण
23.	08.11.25	CDH004	T16: श्वानाला आहार देण्याचे तंत्र: श्वानाच्या आहाराचे वेळापत्रक, निर्धारित आहाराचे फायदे, जास्त किंवा कमी आहार टाळण्यासाठी श्वानाच्या शरीराच्या स्थितीचे निरीक्षण
24.	08.11.25	CDH006	P8: गर्भावस्थेतील आणि स्तनदा मादी श्वानाला आहार देणे
25.	14.11.25	CDH004	T17: श्वानाच्या अन्नव्यवस्थापनातील आधुनिक बाबी: दुग्धशर्करेचे महत्व, पूरक आहार घटक, नाविन्यपूर्ण तंतुमय पदार्थांचा स्रोत, श्वानाच्या वजन व्यवस्थापनात तंतुमय

			पदार्थांचे महत्व, आहारातील मेदाम्ले
26.	14.11.25	CDH004	T18: आजारी श्वानासाठी आहार: मधुमेही किंवा लठ्ठ श्वानासाठी आहार, किडनी विकारांनी ग्रस्त श्वानाची विशेष पोषण काळजी, यकृत विकारांनी ग्रस्त श्वानाची विशेष पोषण काळजी, जठर आणि आतड्यांसंबंधी विकारांनी ग्रस्त श्वानाची विशेष पोषण काळजी, श्वानामधील हृदय विकार प्रतिबंधासाठी पौष्टिक आहाराची धोरणे, तणावग्रस्त श्वानाची विशेष पोषण काळजी
27.	14.11.25	CDH006	P9: नवजात तसेच स्तनपान तोडलेल्या आणि अनाथ श्वान पिल्लांना आहार देणे प्रौढ आणि कष्टकरी श्वानाला आहार देणे
28.	22.11.25	CDH005	T19: श्वानाची रोग प्रतिबंधात्मक आरोग्यकाळजी: श्वानाच्या आजारपणाचा पूर्वइतिहास (केस हिस्ट्री), श्वानातील रोगसुचक लक्षणे, श्वानातील अंतरपरजीवी आणि त्यांचे नियंत्रण, श्वानातील बाह्यपरजीवी आणि नियंत्रण, श्वानाचे लसीकरण
29.	22.11.25	CDH005	T20 श्वानाचे समान्य आजार: श्वानाचे सामान्य विकार, श्वानाच्या पचनसंस्थेचे आजार, श्वानाच्या श्वसनसंस्थेचे आजार, श्वानाच्या मूत्रसंस्थेचे आजार, श्वानाच्या मज्जासंस्थेचे आजार, श्वानाच्या डोळ्यांचे आजार, श्वानाच्या कानांचे आजार, श्वानाचे संसर्गजन्य आजार, श्वानाचे परजीवी रोग
30.	22.11.25	CDH006	P10: श्वानाच्या विविध खाद्य प्रकारांचा अभ्यास करणे
31.	30.11.25	CDH005	T21: श्वानाची त्वचा आणि केसांची काळजी: श्वानाच्या त्वचेची मूलभूत माहिती, श्वानाचे प्रमुख त्वचा विकार, ऋतुमानानुसार श्वानाची त्वचा आणि केसांची काळजी, श्वानाच्या त्वचेच्या सामान्य विकारांवर घरगुती उपाय, श्वानाचे त्वचा व्यवस्थापन आणि पंजाची काळजी श्वानाची प्रथमोपचार काळजी: श्वानासाठी मूलभूत प्रथमोपचार, जखमेची काळजी, अस्थिभंग व्यवस्थापन, पोट फुगणे, उष्माघात, बद्धकोष्ठता, बस्ती, आपत्कालीन परिस्थिती
32.	30.11.25	CDH005	T22: श्वानाची प्रथमोपचार काळजी: श्वानासाठी मूलभूत प्रथमोपचार, जखमेची काळजी, अस्थिभंग व्यवस्थापन, पोट फुगणे, उष्माघात, बद्धकोष्ठता, बस्ती, सामान्य आपत्कालीन परिस्थिती- उष्माघात, नाकातून रक्तस्त्राव, भाजणे, विषबाधा, सर्पदंश, पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आपत्कालीन परिस्थिती हाताळणे
33.	30.11.25	CDH006	P11: श्वानाचे विविध आजार आणि त्यांची लक्षणे अभ्यासणे
34.	13.12.25	CDH005	T23: श्वान संगोपनात पशुवैद्यकीय चिकित्सेचे महत्व: नोंदणीकृत पशुवैद्यक, पशुवैद्यकीय तज्ञ, नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याची माहिती, पशुवैद्यकाशी सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करणे, श्वानाची वेळेवर तपासणी आणि पाठपुरावा, आजारपश्चात काळजी आणि पशुवैद्यकांचा सल्ला
35.	13.12.25	CDH005	T24: वृद्ध श्वानाची काळजी: वृद्ध श्वानाचे वर्तन, वृद्ध श्वानाचे आरोग्य व्यवस्थापन, वृद्ध श्वानाच्या पोषणाचे नियोजन, वृद्ध श्वानाच्या मेंदूच्या आजाराचे व्यवस्थापन, वृद्ध श्वानामधील कमी झालेल्या श्रवणशक्तीचे व्यवस्थापन, वृद्ध श्वानामधील कमी झालेल्या दृष्टीचे व्यवस्थापन दुर्धर आजारी आणि मरणासन्न श्वानाची काळजी: मरणासन्न अवस्थेतील श्वानाच्या काळजीचे महत्व, उपशामक काळजीतील करुणामय पैलू, प्राणी संवादकाचा सल्ला
36.	13.12.25	CDH006	P12: श्वानासाठी प्रथमोपचार पेटी तयार करणे पशुवैद्यकीय दवाखान्याला भेट

श्वानपालक प्रबोधन प्रमाणपत्र शिक्षणक्रमांसाठी संपर्कसत्र वेळापत्रक
द्वितीय सत्र (Semester- II)
जानेवारी 2026 ते मे 2026

संपर्क-सत्र क्र.	संपर्कसत्र दिनांक	अभ्यासक्रम सांकेतांक	**बौद्धिक सत्रः T (Theory): सकाळी 10:00 ते 11:00 आणि 11:00 ते 12:00** **प्रात्यक्षिक सत्रः P (Practical): दुपारी 02:00 ते 4:00**
